उपस्थित भक्तजनहो,

सादर प्रणाम.

आज व्यासपौर्णिमा. आपल्या गीतामंडळातर्फे तमाम श्रेष्ठ गुरुजन, ज्ञानेश्वर माउली व आशाताई यास मन:पूर्वक वंदन करून आपणा सर्वांचे सहर्ष स्वागत करते.

असं म्हणतात, डोळे मिटून प्रेम करते ती मैत्रिण, आई डोळे मिटेपर्यंत माया करते परंतु डोळे मिटल्यावरही प्रेम करतात ते गुरु होत. आशाताईंच्या रूपाने आपल्याला सखी- माता- गुरु मिळाल्या आहेत. त्यांची गुजरात ही जन्मभूमी, महाराष्ट्र ही तपोभूमी व पंचवटी ही कर्मभूमी आहे. तप, उपासना व स्वधर्मनिष्ठा या त्रिसूत्रीवर त्यांनी माउलीसेवेत स्वत:चे आयुष्य सुंदरपणे गुंफून घेतलं आहे.

दरवर्षी निघणाऱ्या वारीचा प्रत्येकवेळी रंग मोहक असतो. तद्वत् दर बुधवारी आपण इकडे एका वेगळ्याच ओढीने येतो. वेदांचे ~~तत्वदर्शी~~ तत्त्वदर्शी सौंदर्य म्हणजे गीता व गीतेची ज्ञानदर्शी सुंदरता म्हणजे ज्ञानेश्वरी होय. आशाताई दोहोंचे भावस्पर्शी लावण्य आपणास अलगद उलगडून दाखवितात. गीतेच्या अध्यायाबरोबरच ज्ञानेश्वरी नित्यपाठ आत्मसात करण्यासाठी साधना करायला प्रोत्साहन देतात. या साधनेत सातत्य असलं की सहजता निर्माण होते. त्यातून निर्दोषता लाभते. यावरून आठवण झाली बँकेतील एका बोर्डाची. त्यावर लिहिलं होतं : मुलाबाळांचं रक्षण करता आलं, आल्या गेलेल्याचा यथोचित पाहुणचार करता आला, नितिमत्तेने जगता येईल इतका पैसा जवळ असला म्हणजे ती व्यक्ति श्रीमंत म्हणायची. या merit list मध्ये आपल्या गुरु एकदम topper आहेत. We all are absolutely proud of you, our teacher!

फुलाला फूल जोडलं की सुंदर हार तयार होतो. इथे माणसाला माणूस जोडलं जाऊन माणुसकीचं एक अतूट नातं निर्माण होतं. सच्चे कार्यकर्ते वारीत चुकलेल्या वारकऱ्यांना उचित जागी सोडण्याचे काम स्वयंस्फूर्तीने करतात त्याप्रमाणे आम्हां सारख्यांना योग्य दिशा दाखविण्याचे महान कार्य त्या करतात; आत्मशोध व आत्मबोध करायची प्रेरणा देतात; सुविचारांची पालखी पसायदानाच्या पंढरीला नेतात.

एक विमान हेलकावे खात होतं. एक मुलगी शांत होती. तिला विचारलं, " तू घाबरली कशी नाहीस? ' ती म्हणाली, " माझे बाबा या विमानाचे पायलट आहेत ज्यांच्यावर माझा पूर्ण भरवसा आहे. ' असाच दृढविश्वास आपल्या सर्वांचा गुरुवर्यांवर आहे. जेव्हा त्या या खुर्चीवर बसतात तेव्हा त्यांची तेजस्वी मुद्रा,

DHIRUBHAI AMBANI
INTERNATIONAL SCHOOL

रसाळ वाणी व सखोल अभ्यास यामुळे आमच्या मरगळलेल्या मनाला चैतन्य मिळतं. नेतृत्त्व, कर्तृत्त्व व दातृत्त्व यांचा अनोखा संगम आम्हाला स्फूर्ती देतो. ज्ञानेश्वर महाराज यांच्या गुरुबंधू पायी लीन होत असत. मग आम्हांला हि म्हणावेसे वाटते, " मनी आणावे ते होते। विघ्न अवघेची नासोनी जाते।
कृपा केलिया गुरुवर्यांनी। त्याची वारंवार प्रचीती येते।"
कर्मापासून विकर्म, अकर्म व नैष्कर्म्य करणाऱ्या या गुरुं बद्दल बोलायला वैखरी अपुरी वाटते.

आशाताईंच्या दोन्ही कन्यका मागल्या वर्षी सहभागी झाल्या होत्या. आज गीता पिंप्रीकर व अन्य काहींची अनुपस्थिती जाणवते.

आजच्या या आनंद सोहळ्याने मन भरून आलं आहे. समस्त जोशी परिवार व सर्व सख्यांना सुखशांती लाभो ही माऊली चरणी प्रार्थना.

मंडळातर्फे या व्यासपीठावर कृतज्ञता ~~आ~~ व्यक्त करण्याची संधी मिळाली म्हणून मी अत्यंत आभारी आहे.

पुढील रूपरेषा:

1) प्रार्थना, अध्याय पठण इ.
२) विविध गटांतर्फे अभंगरचना सादरीकरण. व मनोगत व्यक्त करणे
3) माऊलींना हार घालणे: मोना इख.
आशाताईंचा सत्कार : हिराताई निमसे.
४) आभार प्रदर्शन : सुनिता आगाशे.
५) तनुजाताईंतर्फे dish.
६) कार्यक्रम सांगता
आवरण्यास मदत करणे.

धन्यवाद
श्यामला पुरंदरे ३१.०७.२०१५
गुरुपौर्णिमा, शुक्रवार
m: 94036 25724
L.: (020) 2589 8534